दिनांक :   .9.2019

प्रति,

मा. राज्यपाल,

ओडिशा राज्य.

**विषय : पुरी (ओडिशा) येथील श्री जगन्नाथ मंदिराच्या सुरक्षेच्या नावाखाली सरकारने तेथील प्राचीन मठ आणि मंदिरे यांना बेकायदा ठरवून ती पाडण्याची अयोग्य कारवाई रोखण्याविषयी.....**

महोदय,

ओडिशा सरकारने पुरी येथील श्री जगन्नाथ मंदिराच्या तीर्थक्षेत्राला ऐतिहासिक शहर बनवणे, सौंदर्यीकरण आणि मंदिरावरील संभाव्य आतंकवादी आक्रमणापासून रक्षण करणे, या कारणास्तव काही योजना आखल्या आहेत. या अनुषंगाने मंदिराच्या सुरक्षेसाठी चारही बाजूंनी ७५ मीटर जागा मोकळी करण्याचा निर्णय घेतला आहे. या क्षेत्रामध्ये एमार मठ, लांगुली मठ, बडा आखाडा मठ असे विविध प्रकारचे १२ प्राचीन मठ, यात्री निवास आणि १७५ घरे आहेत. हे सर्व मठ, यात्री निवास आणि वैयक्तिक घरे बेकायदा ठरवून पाडण्याचे काम प्रशासनाने चालू आहे. प्रशासनाची ही कृती म्हणजे विकासाच्या नावावर हिंदु धर्माचे प्रतीक असलेले प्राचीन मठ, त्यांच्या परंपरा आणि तेथे असलेल्या प्राचीन मूर्ती यांना नष्ट करण्याचे षड्यंत्र आहे.

*** तरी या संदर्भात चालू असलेल्या काही घडामोडी आम्ही आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो**

१. प्रशासनाने श्री जगन्नाथ मंदिर क्षेत्रातील ९०० वर्षे पुरातन असलेला एमार मठ बेकायदा ठरवून पाडला. याचसमवेत मंदिराच्या मेघनाद भिंतीला लागून असलेल्या लांगुली मठही प्रशासनाकडून पाडण्यात आला आहे.

२. वरील मठ पाडल्यानंतर प्रशासनाकडून आता ‘बडा आखाडा मठ’ पाडण्यात येणार आहे. हा मठ वर्ष १४०२ मध्ये नागा साधूंनी स्थापन केला होता. या मठाची स्थापनाच मूळात बाह्य आक्रमणकर्त्यांकडून श्री जगन्नाथ मंदिराचे संरक्षण करण्यासाठी झाली होती.

३. १४ व्या शताब्दीमध्ये श्रीरामानंद नावाच्या महान साधूंचे आगमन पुरी येथे झाले होते. त्या वेळी त्यांनी मंदिराच्या रक्षणासाठी अनेक मठ, धार्मिक केंद्रे स्थापना केली होती. या मठांची स्थापना झाल्यानंतर तेथे रितीनीती, श्री जगन्नाथांची संस्कृतीचे पालन आणि नामसंकिर्तन नियमित चालू असायचे. त्यामुळे मंदिराच्या क्षेत्रामध्ये ठिकाणी येणाऱ्या अनेक साधूंसाठी सर्व मठ हे तीर्थक्षेत्रासारखेच आहेत. मंदिराच्या क्षेत्रामध्ये उभारलेल्या मठांनी पुरी शहराला ‘धार्मिक राजधानी’ म्हणून मान्यता मिळवून दिली होती. आता वरील मठ उद्ध्वस्त करण्यात येत असल्यामुळे पुरी शहराला मिळालेला नावलौकिक गमावून बसणार आहे.

४. प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या कारवाईविषयी बडा आखाडा मठाचे महंत हरिनारायण दास यांनी सांगितले की, मठाची प्राचीन संस्कृती आणि परंपरा यांचे होत असलेले संवर्धन अन् संरक्षण यांना नष्ट केले जात आहे. प्रशासनाकडून प्राचीन मूर्ती, परंपरा आणि संस्कृती यांच्या जतनासाठी कोणतेही प्रयत्न केले जात नाहीत.

५. या प्रकरणी पुरी पिठाचे शंकराचार्य जगद्गुरु निश्चलानंद सरस्वती यांनी म्हटले आहे की, ओडिशा उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती बी.पी. दास यांच्या नेतृत्वाखालील समितीने मंदिराच्या चारही बाजूला ७५ मीटर क्षेत्र मोकळे करण्याचा सल्ला दिला होता; पण दास यांनी माझ्याशी याविषयी कधीच भेटून चर्चा केली नाही. श्री जगन्नाथ मंदिरासमवेत मठांची परंपरा जोडलेली आहे. या मठांचे संचालन स्वतंत्ररित्या झाले पाहिजे. सरकारने मोठ्या संख्येने मठ तोडण्याचा निर्णय घेतला, त्या वेळी त्यांचे विस्थापन कसे करणार ?, याचे नियोजन करायला हवे होते. विकासाच्या नावावर प्राचीन मठांना तोडण्याचे षड्यंत्र रचले जात आहे.

६. एकूण या प्रकरणातून असे दिसून येते की, सरकारने अथवा श्री जगन्नाथ मंदिराच्या संरक्षणासाठी स्थापन केलेल्या

समितीने हिंदु धर्मियांचे सर्वोच्च श्रद्धास्थान असलेल्या शंकराचार्यांचे मठांचे उद्ध्वस्तीकरण करतांना मत विचारात घेतलेले नाही. ही गोष्ट हिंदु धर्मामध्ये हस्तक्षेप करण्यासारखीच असून ती अत्यंत चुकीची आणि निषेधार्ह आहे. यामुळे देशभरातील हिंदु धर्मियांच्या धार्मिक भावना दुखावणारी आहे.

*** तरी या प्रकरणी आम्ही पुढील मागण्या करत आहोत....**

१. श्री जगन्नाथ मंदिराच्या क्षेत्रातील मठ, मंदिरे यांना बेकायदा ठरवून ती पाडण्याची चुकीची कारवाई तात्काळ थांबवण्यात यावी.

२. आतापर्यंत जे प्राचीन मठ तोडण्यात आले, त्यांना ओडिशा सरकारने ते मठ पुन्हा उभारून द्यावेत आणि झालेल्या हानीची भरपाई करून द्यावी, तसेच प्राचीन मूर्त्या अन् परंपरा यांच्या संर्वधनासाठी प्रयत्न करावेत.

३. श्री जगन्नाथ मंदिराच्या सुरक्षेसाठी केंद्रीय गृह मंत्रालय आणि राज्य शासनाचे गृह विभाग यांची उच्चस्तरीय संयुक्त सुरक्षा समिती स्थापन करावी अन् मठ, मंदिरे यांना धक्का न पोचवता प्रशासनाने उपाययोजना राबवावी.

४. मंदिराच्या क्षेत्रातील मठ, मंदिरे यांना ज्या अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी बेकायदा ठरवण्याची अयोग्य कृती केली, त्यांच्यावरही कठोर कायदेशीर कारवाई करावी.

प्रत : आपला विश्वासू,

१. मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी,
भारत सरकार, नवी देहली.

२. मा. केंद्रीय गृहमंत्री,
भारत सरकार, नवी देहली.

संपर्क :